Golden Research Thoughts ISSN 2231-5063
Volume-3, Issue-2, August-2013

# भारताच्या शेती निर्यात व्यापाराचे स्वरूप व दिशा

## दिनकर टकले
अर्थशास्त्र विभाग प्रमुख, लालबहादूर शास्त्री महाविद्यालय, जि. जालना परतूर

***सारांश :*** भारत हा कृषीप्रधान देश आहे. आज सुध्दा शेतीवर अवलंबून असलेल्या लोकसंख्येचे प्रमाण जवळपास 65 टक्के आहे. कृषी व्यवसायावरचे अवलंबीत्व कमी झालेले नाही. परंतू राष्ट्रीय उत्पन्नाचा हिस्सा मात्र कमी झाला आहे. भारतीय शेती आज सुध्दा पारंपारिक पध्दतीने करणाऱ्यांची संख्या मोठी आहे. भारतीय शेतीत संसाधनांचा वापर कार्यक्षमपणे होत नाही हे अनेक अभ्यासकांनी सिध्द केले आहे. शेतकऱ्यांचे जीवन शेतीतून मिळणाऱ्या उत्पन्नावर अवलंबून आहे. शेती उत्पादक उत्पादन चांगले घेऊ शकतील, परंतु त्या उत्पादनाचे उत्पन्नात रूपांतर करणे त्यांच्या हातात नसून ते सर्वस्वी कृषी बाजारावर अवलंबून आहे.

***प्रस्तवाना :***

आज जागतिकीकरण व उदारीकरणाच्या युगात जगातील बाजारपेठेतील अंतर कमी होत आहे. शेतमाल बाजारपेठेवर शेती निर्यात धोरणाचा परिणाम लवकर जाणवतो. शेतमाल ही आवश्यक वस्तु असल्यामुळे शेतमाल किंमत स्थिरीकरणासाठी शेतमाल आयात निर्यातिवर सरकारचे नियंत्रण आहे. भारतीय शेतीत एखाद्या शेती हंगामात विशिष्ट शेतमालाचे अतिरिक्त उत्पादन (उपभोगापेक्षा जास्त) झाले तरच शेतमाल निर्यातीचा सरकार विचार करते. शेतीला उद्योगासारखा दर्जा दिला तरी कृषी उत्पादनातील अनिश्चितता व पावसाच्या लहरीपणामुळे शेती सतत नफ्यात करणे अवघड आहे. प्रस्तुत लेखात भारतीय शेती निर्यात व्यापाराचे स्वरूप व व्यापाराची दिशा स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यासाठी भारतीय शेतीचे बदलते स्वरूप, कृषी विपणनात होणारे बदल, जागतिकरणाचा शेती निर्यात व्यापारावर होणारा परिणाम, शेतमाल निर्यात व्यापाराची दिशा आणि शेतमाल निर्यात अडचणी व उपाययोजना इत्यादी बाबींचा अभ्यास केला आहे.

***2.0 संशोधनाची उद्दिष्टये (Objectives) :***

भारताच्या शेती निर्यात व्यापाराचे स्वरूप व दिशा स्पष्ट करण्यासाठी प्रस्तुत संशोधनात पुढील उद्दिष्टये निश्चित केली आहेत.

1)भारतीय शेतीचे बदलते स्वरूप स्पष्ट करणे.
2)शेतमाल निर्यातीचे स्वरूप स्पष्ट करणे.
3)भारतीय शेती निर्यात व्यापाराची दिशा स्पष्ट करणे.
4)जागतिकीकरणाचा शेती निर्यात व्यापारावरील परिणाम तपासणे.
5)शेतमाल निर्यातीच्या समस्या स्पष्ट करून उपाययोजना सुचविणे.

***3.0 संशोधन पध्दती (Research Methodology) :***

प्रस्तुत संशोधनासाठी द्वितीय माहिती स्त्रोताचा आधार घेतला आहे. भारताच्या शेती निर्यात व्यापाराचे स्वरूप व दिशा स्पष्ट करण्यासाठी भारताचा आर्थिक पाहणी अहवाल, कृषी विभागाचे विविध अहवाल, शेती संबंधीत विविध पाक्षिक, मासिक, संशोधनाचे अहवाल इत्यादिंचा आधार घेतला आहे. ब्डप्म यांच्याकडून प्रकाशित झालेली माहिती 1960–61 ते 2011–12 या कालगणनेसाठी (Time Series Dat) उपयोगात आणली आहे. भारताच्या शेती निर्यातीची संरचना व दिशा स्पष्ट करण्यासाठी टक्केवारी, सरासरी मूल्य, वृध्दीदर इत्यादी सांख्यिकीय साधनांचा वापर केला आहे. विश्लेषणाची विभागणी 1960–61 ते 2000–01 हा एक कालखंड आणि 2001–02 ते 2011–12 या कालखंडात केली आहे. पहिल्या कालखंडासाठी दशवार्षिक वृध्दीदर तर दुसऱ्या कालखंडासाठी वार्षिक वृध्दीदर विचारात घेतला आहे.

***4.0 भारतीय शेतीचे बदलते स्वरूप :***

भारतात लागवडी योग्य शेती अमेरिकेनंतरची जगातील दुसऱ्या क्रमांकाची शेती आहे. एकूण 159.7 मिलीयन हेक्टर शेती भारतात लागवडी योग्य आहे. यापैकी 82.6 मिलीयन हेक्टर शेती सिंचनाखाली आहे. जगात सर्वात जास्त सिंचनाखाली जमीन भारतातच आहे. जगातील सर्वात जास्त पशुधन, सर्वात जास्त दुध उत्पादन आणि सर्वात मोठा कुक्कुटपालन उद्योग भारतात आहे. भारतीय कृषी क्षेत्रातून जवळपास स्थुल राष्ट्रीय उत्पादनाच्या 16 टक्के उत्पादन होते. एकूण निर्यात उत्पन्नापैकी 10 टक्के उत्पन्न शेतीतून प्राप्त होते. आज सुध्दा भारतीय कृषी व्यवसाय वृध्दी करण्यासाठी फार मोठा वाव आहे. जागतिकीकरण व उदारीकरण प्रक्रियेत भारतीय शेती समोर प्रचंड स्पर्धा निर्माण झाली आहे. जर भारतीय शेतीला स्पर्धेत टीकायचे असेल तर उत्पादनाचा दर्जा व उत्पादकता यात सुधारणा करणे अत्यंत गरजेचे आहे. भारतीय कृषी वस्तूंना जगात भरपुर मागणी आहे. या संधीचा फायदा घेवून भारताने शेतमाल निर्यातीत कितीतरी पटीने वाढ घडवून आणली आहे. परंतु शेतमाल व्यतिरिक्त वस्तूंची निर्यात जास्त असल्यामुळे एकूण निर्यातीत कृषी क्षेत्राचा हिस्सा सतत घटत असल्याचे दिसते.

भारतात पारंपारिक शेती कसण्याचे प्रमाण सातत्याने कमी होत असून शेती आधुनिकतेकडे वाटचाल करीत आहे. शेतीमध्ये यांत्रिकीकरणाचा वापर वाढत आहे. आज भारतीय शेतीला प्रवाही सिंचन पध्दतीने मोठया प्रमाणात पाणी दिले जाते. परंतू काळाची गरज लक्षात घेवून ही पध्दती बंद होणे गरजेचे आहे. ठिबक सिंचन पध्दतीचा वापर पाणी बचतीसाठी आवश्यक आहे. सरकारने पाणी बचत करणाऱ्या सिंचन पध्दतीवर जास्तीत जास्त अनुदान देणे गरजेचे आहे. यामुळे पाणी बचत तर होईलच त्याचबरोबर उत्पादकता सुध्दा वाढेल. एकूण उत्पादन व उत्पादकता वाढली तरच भारतीय शेतमाल निर्यातीच्या जास्त संधी उपलब्ध होवू शकतात.

***5.0 भारतातील शेतमाल निर्यातीचे स्वरूप :***

भारतातून जागतिक बाजारपेठेत कोणत्या प्रकारचा शेतमाल व शेती संबंधीत वस्तू निर्यात होतात त्याचे विश्लेषण महत्वाचे आहे. शेतमाल निर्यातीत प्रामुख्याने तृणधान्ये व तत्संबंधी वस्तू, भाजीपाला, फळे, दाळी, चहा व कॉफी, मसाले पदार्थ, तंबाखू, कपासी, समुद्रातील उत्पादने, मांस व प्रक्रिया केलेले मासजन्य पदार्थ, दुध व दुग्धजन्य पदार्थ, तेल व तेलबिया उत्पादने, साखर इत्यादिंचा समावेश होतो. भारताची लोकसंख्या जास्त असल्यामुळे स्वदेशातील उपभोग संरक्षीत केल्यानंतर सरकारकडून संबंधीत वस्तूंच्या निर्यातीला परवानगी दिली जाते. शेतमाल निर्यातीत प्रामुख्याने तृणधान्ये, कापूस, मांस, फळे व समुद्री मासे यांचा मोठा वाटा असल्याचे दिसून येते.

शेतमाल निर्यातीत वस्तूची विभागणी जेवढी महत्वाची आहे तेवढेच शेतमालाची निर्यात कोणत्या देशांना किती प्रमाणात होते हे सुध्दा महत्वाचे आहे. शेतमालाची सर्वात जास्त निर्यात दक्षिण आशिया, आशिया पॅसेफीक, चीन, जपान, युरोपीय संघ, अमेरिका, पूर्वीय देश इत्यादी देशांना होते. भारताच्या शेतमाल निर्यातीत वेगवेगळया देशांना होणारी निर्यात काळानुसार कमी जास्त झाली आहे. 1980 च्या दशकात शेतमाल निर्यातीत जपान, युरोपीय संघ यांचा वाटा जास्त होता. परंतू आज या देशांचा वाटा इतर देशांच्या तुलनेत कमी झाला आहे. मात्र दक्षिण आशिया, चीन, अमेरिका, आशिया पॅसिफिक या देशांना भारतीय शेतमालाची निर्यात वाढतांना दिसत आहे. फळे व भाजीपाला प्रामुख्याने पाकिस्तान, बांगलादेश, अमेरिका, जपान, नेदरलॅण्ड इत्यादी देशांना निर्यात होतो. बासमती तांदुळ निर्यात सर्वात जास्त सौदी अरेबिया, कुवैत, संयुक्त अरब अमीरात, इंग्लंड, येमेन या देशांना होतो. दुध व दुग्धजन्य उत्पादनाची निर्यात अल्जेरीया, बांगलादेश, येमेन व अरब अमिरात या देशांना होते. भारतातून डाळींची होणारी निर्यात श्रीलंका, पाकीस्तान, नेपाळ, बांगलादेश, संयुक्त अरब अमिरात या प्रमुख देशांना होते. एकुणच भारतीय शेतमाल निर्यातीचे स्वरूप स्पष्ट करतांना असे दिसते की, सर्वात जासत निर्यात आशियाई देशांना होत आहे.

ISSN 2231-5063
Volume-3, Issue-2, August-2013

***6.0 अ) शेतमाल निर्यात व्यापाराची प्रवृत्ती : (1960–61 ते 2000–01)***

भारतात शेतमाल व्यापार आंतरराष्ट्रीय स्तरावर फार वर्षापासून चालत होता. स्वातंत्र्यानंतर नियोजनबध्द विकासासाठी कृषी विकासाकडे लक्ष देवून कृषी व्यापाराला चालना दिली. नियोजनाच्या सुरूवातीच्या कालखंडात एकूण निर्यातीत कृषी निर्यातीचा वाटा मोठा होता. याचे महत्वाचे कारण भारतात कृषी व्यवसायाला इतर व्यवसायापेक्षा जास्त महत्व होते. भारतातील कृषी निर्यातीची प्रवृत्ती किंवा दिशा तक्ता क्र. 1 मध्ये स्पष्ट केली आहे. कृषी निर्यातीची प्रवृत्ती स्पष्ट करण्यासाठी दोन कालखंडात विभागणी महत्वाची आहे. 1990–91 पर्यंतचा कृषी निर्यात व्यापार व 1990–91 ते 2011–12 या कालखंडातील कृषी निर्यात व्यापाराच्याद्वारे व्यापाराची प्रवृत्ती स्पष्ट केली आहे. याचाच अर्थ असा की, जागतिकीकरणापूर्वीचा कृषी निर्यात व्यापार व नंतरचा कृषी निर्यात व्यापार पाहणी महत्वाची वाटते. तक्ता क्र. 1 वरून स्पष्ट होते की, 1960–61 मध्ये एकूण शेती व शेती संबंधीत वस्तूंची निर्यात 596 मिलीयन अमेरिकन डॉलर एवढी होती. भारताच्या एकूण निर्यातीत कृषी निर्यातीचा वाटा 44.27 टक्के होता. 1980–81 मध्ये शेतमाल निर्यात 2601 मिलियन यू. एस. डॉलर एवढी वाढली. परंतू एकूण निर्यातीत कृषी निर्यातीचे प्रमाण मात्र 30.65 टक्क्यापर्यंत घसरले. एकुणच 1960–61 ते 2000–01 या चाळीस वर्षाच्या कालखंडात एकुण निर्यातीत शेतीमाल व तत्संबंधी वस्तूंच्या निर्यातीचे प्रमाण सरासरी 28 टक्के होते. शेतमालाची निर्यात सतत वाढत असतांना एकुण निर्यातीत शेतमाल निर्यातीचे प्रमाण सतत घटत असल्याचे दिसून आले. याचे महत्वाचे कारण म्हणजे एकूण निर्यातीत शेतीव्यतिरिक्त वस्तूंच्या निर्यातीचे प्रमाण वाढत आहे. 1960 ते 2000 या चाळीस वर्षाच्या काळात निर्यात वृध्दी दर सरासरी 157.02 टक्के होता. तर कृषी निर्यात वृध्दीदर सरासरी 106.24 टक्के होता. एकंदरीत कृषी निर्यात वृध्दी दर एकुण निर्यात वृध्दी दरापेक्षा कमी दिसून आला.

***ब) शेतमाल निर्यात व्यापाराची प्रवृत्ती (2001–02 ते 2011–12):***

एकुण निर्यातीत कृषी व कृषीसंबंधीत वस्तुंचे विश्लेषण करतांना असे दिसते की, पहिल्या कालखंडातील वृध्दी दर जास्त होता. मात्र 2001–02 ते 2011–12 या कालखंडातील सरासरी वृध्दी दर कमी झालेला दिसतो. तक्ता क्रमांक 2 मध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे या कालखंडात एकुण निर्यातीचा सरासरी वृध्दीदर 21.68 टक्के दिसून आला तर याच काळात कृषी निर्यातीचा सरासरी वृध्दी दर 21.54 टक्के दिसून आला. एकुण निर्यातीत झालेली वाढ सर्वात जास्त 2010–11 मध्ये (35.92 टक्के) आहे. तर सर्वात कमी निर्यात वृध्दी (6.27 टक्के) 2009–10 या वर्षात झाली. त्याचे महत्वाचे कारण म्हणजे 2008 मध्ये आलेली जागतिक मंदी होय. जागतिक मंदीचा परिणाम 2008–09 मधील कृषी निर्यात वृध्दी दरावर झाला. हा वृध्दी दर 8.37 टक्के दिसून आला. कृषी निर्यात वृध्दी दर सर्वात जास्त (52.95 टक्के) 2007–08 मध्ये होता. एकंदरीत 2001–02 ते 2011–12 या अकरा वर्षाच्या कालखंडात सरासरी वार्षिक निर्यात 140616 मिलियन अमेरिकन डॉलर राहिली. याच काळात कृषी व तत्संबंधी वस्तुंची सरासरी वार्षिक निर्यात 15500 मिलियन अमेरिकन डॉलर राहिली.

1960–61 ते 2000–01 या चाळीस वर्षातील दशवार्षिक निर्यात वृध्दी दरापेक्षा 2001–02 ते 2011–12 या काळातील वार्षिक वृध्दीदर जास्त दिसून आला. शेती वस्तुची निर्यातीचा एकुण निर्यातीत असणारा वाटा या कालखंडात वार्षिक सरासरी 11.20 टक्के होता.

***7.0 शेतमाल निर्यात व्यापाराची संरचना :***

भारतातील कृषी निर्यात व्यापाराची संरचना स्पष्ट करतांना कोणत्या वस्तुंची निर्यात किती प्रमाणात होते याचे स्पष्टीकरण महत्वाचे ठरते. 1960–61 ते 2010–11 या 50 वर्षाच्या कालखंडात भारतीय कृषी वस्तुंची निर्यात कशी बदलत गेली याचा आढावा तक्ता क्र. 3 मध्ये दर्शविला आहे.

तक्त्यामधील विश्लेषणानुसार असे दिसते की, एकुण 13 वस्तुंची निर्यात कशा पध्दतीने बदलली हे स्पष्ट होते. कॉफीची निर्यात एकुण कृषी निर्यात 1960–61 मध्ये 2.5 टक्के होती. हिच निर्यात 2010–11 मध्ये 2.6 टक्के म्हणजे सारखीच राहिली. एकुण कृषी वस्तुंच्या निर्यातीत चहा, काजु, साखर या वस्तुंचे प्रमाण वाढले. एकुण कृषी निर्यातीत चहाच्या निर्यातीचा वाटा 1960–61 मध्ये 43.6 टक्के होता तर हाच वाटा 2010–11 मध्ये फक्त 2.9 टक्के राहीला. तंबाखूच्या निर्यात वाटयात सुध्दा घट झाली. कच्चा कापुस निर्यात वाटा सर्वात जास्त 1990–91 या वर्षात होता तर सर्वात कमी 2000–01 या वर्षात होता. मासे व सागरी उत्पादनाचा एकुण कृषी निर्यातीत वाटा सर्वात जास्त 22.2 टक्के 2000–01 मध्ये होता.

वर्षनिहाय विश्लेषणाचा आढावा घेतला असता असे दिसते की, एकुण कृषीमाल निर्यात सर्वात जास्त वाटा 1960–61 ते 1990–91 पर्यंत चहा निर्यातीचा होता. 2000–01 मध्ये मांसे व सागरी उत्पादने, 2008–09 मध्ये तांदुळ आणि 2010–11 मध्ये कच्चा कापुस या कृषी वस्तुंचा एकुण कृषी निर्यातीतील वाटा सर्वात जास्त होता.

***8.0 जागतिक व्यापार संघटना व कृषी निर्यात :***

जागतिक व्यापार संघटना अस्तित्वात आल्यानंतर कृषी निर्यात व आयात मुक्त करण्यासाठी दबाव वाढत गेला. तक्ता क्र. 1 व तक्ता क्र. 2 च्या आकडेवारीवरून असे दिसते की, जागतिक व्यापार संघटना स्थापण्यापूर्वी कृषी निर्यातीचा एकुण निर्यातीतील वाटा जास्त होता. मात्र 1990–91 नंतरच्या कालखंडात हा वाटा सरासरी वार्षिक 11 टक्के राहीला. विकसीत देशाकडून शेतमाल निर्यातीसाठी दिली जाणारी अनुदाने मंत्री परिषदेच्या जागतिक बैठकीत सतत वादाचा विषय राहीला. विकसनशील देशातील कृषी अनुदाने विकसित देशापेक्षा कमी होती. निर्यातीत इतर वस्तुंचे प्रमाण वाढले तर कृषी वस्तुंचे प्रमाण कमी झाले हा जागतिकीकरणाचाच परिणाम आहे.

***9.0 शेतमाल निर्यात अडचणी व उपाययोजना :***

भारताच्या एकुण निर्यातीत कृषी व तत्संबंधीत वस्तुंचे महत्व आहे. भारतात प्रमुख व्यवसाय शेती असल्यामुळे कृषी निर्यात धोरणाचा परिणाम शेतकऱ्यांवर दिसून येतो. भारतात कृषी मालाच्या निर्यातीतील प्रमुख अडचणी खालील प्रमाणे आहेत.

1) भारतात कृषी उत्पादनाबरोबरच कृषीमाल उपभोगाचे प्रमाण जास्त असल्यामुळे विक्री योग्य वाढावा निर्माण होत नाही.
2)विकसित देशाकडून दिली जाणारी कृषीमाल निर्यात अनुदाने जास्त तर भारतासारख्या देशात कृषी अनुदाने कमी आहे.
3)भारतातील शेतमालाचा दर्जा, शितकरण सुविधा, शेतमाल निर्यात केंद्र इत्यादिंची कमतरता आहे.
4)भारतातील कृषीमाल निर्यातीत प्रत्यक्ष पध्दतीने शेतकऱ्यांच्या सहभाग कमी आहे.
5)कृषीमालात रासायनिक खतांचा वापर वाढल्यामुळे कृषीमाल निर्यातीत अडथळे येतात.
6)भारतात कृषी उत्पादने निर्यात झोनची स्थापना कमी आहे.

सारांश, उपरोक्त समस्या कृषी निर्यातीत असल्यातरी या समस्यांवर मात करून कृषी निर्यातीत वाढ होणे गरजेचे आहे. त्यासाठी काही उपाययोजना महत्वाच्या ठरतात.

1)भारतात मोठया प्रमाणात विशेष कृषी क्षेत्र (SAZ) स्थापन करावीत जेणेकरून कृषी निर्यात वाढीला चालना मिळेल.
2)निर्यातीसाठी कृषी वाढावा होणे गरजेचे आहे म्हणुन कृषीमाल उत्पादकता वाढवावी.
3) विकसित देशाप्रमाणे भारताने कृषी निर्यात अनुदाने वाढवावी.
4) कृषीमालाचे योग्य प्रतवारीकरण करून, शितगृहे वाढवुन कृषीमाल निर्यातीला प्रोत्साहन द्यावे.
5)कृषीमालाचे व्यापारीकरण करून निर्यातीस कृषी उत्पादनासाठी सरकारने व्यवस्था उभी करावी.

***संदर्भ :***

1.Santosh Sachdev (2000), "Agricultural Exports in India: Lesions from East Asia", New Century Publication.
2.Kehar Singh & Inder Sain (2003), "Prospects of Agricultural Exports of India: A Composite Index Approach, Indian Journal of Agricultural Economics, Oct. Dec., 5 & 4, PP. 781-799.
3.Shinoj P. and V.C. Mathur (2008), "Comparative Advantage of India in Agricultural Economics Research Review", Vol. 21, Jane. - June, PP. 60-66.
4.Aksoy, M.A. and Beghin J. C. (2005), "Global Agricultural Trade and Developing Countries", Manas Publications, New Delhi.
5.India Economic Survey, 2011-12.
6.The Financial Express, 30 Dec. 2012.
7.http://indiabudget.nic.in
8.Sunny Thomas and Waheeda Sheikh (2012), "Growth and

ISSN 2231-5063
Volume-3, Issue-2, August-2013

Composition of Indian Agricultural Exports during Reform Era", www.abhinavjournal.com, Vol. -1, Issue - 6, PP. 92-104.
9.Nageshwara M. R. and S. Srinivas Rao (2009), Direction of Trade in Indian Agricultural Commodity Exports, Southern Economist, Vol. 47, No. 19, P. 23.

***तक्ता क्र. 1 : भारतातील कृषी निर्यातीची प्रवृत्ती (1960–61 ते 2000–01)***

(Trends of Agricultural Exports in India)

| वर्ष | एकुण निर्यात (मिलियन **USD**) | शेती व शेती संबंधित वस्तुंची निर्यात (मिलियन **USD**) | शेती निर्यातीचा एकुण निर्यातीत वाटा (**%**) | दहावर्षीय वृध्दी दर (**%**) | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | एकुण निर्यात | शेती व शेती संबंधीत वस्तुंची निर्यात |
| 1960–61 | 1346 | 596 | 44.27 | – – | – – |
| 1970–71 | 2031 | 644 | 31.71 | 50.89 | 8.05 |
| 1980–81 | 8486 | 2601 | 30.65 | 317.82 | 303.88 |
| 1990–91 | 18143 | 3521 | 19.40 | 113.8 | 35.37 |
| 2000–01 | 44566 | 6256 | 14.04 | 145.6 | 77.67 |
| सरासरी | 14913.2 | 2723.6 | 28.01 | 157.02 | 106.24 |

संदर्भ : Data Calculated from India Economic Survey - 2011.12.

***तक्ता क्र. 2 : भारतातील कृषी निर्यातीची प्रवृत्ती (2001–02 ते 2011–12)***

| वर्ष | एकुण निर्यात (मिलियन **USD**) | शेती व शेती संबंधित वस्तुंची निर्यात (मिलियन **USD**) | शेती निर्यातीचा एकुण निर्यातीत वाटा (**%**) | दहावर्षीय वृध्दी दर (**%**) | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | एकुण निर्यात | शेती व शेती संबंधीत वस्तुंची निर्यात |
| 2001–02 | 43827 | 5901 | 13.46 | – – | – – |
| 2002–03 | 52719 | 6710 | 12.73 | 20.28 | 13.71 |
| 2003–04 | 63843 | 7533 | 11.80 | 21.10 | 12.26 |
| 2004–05 | 83536 | 8475 | 10.14 | 30.85 | 12.50 |
| 2005–06 | 103090 | 10214 | 9.91 | 23.41 | 20.51 |
| 2006–07 | 126362 | 12683 | 10.03 | 22.57 | 24.17 |
| 2007–08 | 159007 | 19399 | 12.20 | 25.83 | 52.95 |
| 2008–09 | 173865 | 17775 | 10.22 | 9.34 | 8.37 |
| 2009–10 | 184770 | 19572 | 10.60 | 6.27 | 10.11 |
| 2010–11 | 251136 | 24827 | 9.88 | 35.92 | 26.85 |
| 2011–12 | 304623 | 37421 | 12.28 | 21.30 | 50.73 |
| सरासरी | 140616 | 15500 | 11.20 | 21.68 | 21.54 |

***संदर्भ :*** Data Calculated from India Economic Survey - 2011-12.

***तक्ता क्र. 3 : प्रमुख कृषी निर्यात वस्तु आणि त्यांचा कृषी निर्यातीतील वाटा***

(वाटा : व एकुण मिलियन USD )

| अ. क्र | वस्तु | 1960&61 | 1970&71 | 1980&81 | 1990&91 | 2000&01 | 2008&09 | 2010&11 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | कॉफी | 2.5 | 5.1 | 10.4 | 4.0 | 4.1 | 2.6 | 2.6 |
| 2 | चहा | 43.6 | 30.4 | 20.7 | 16.9 | 6.2 | 3.1 | 2.9 |
| 3 | तेल | 4.9 | 11.3 | 6.1 | 9.6 | 7.1 | 12.0 | 9.5 |
| 4 | तंबाखु | 5.7 | 6.7 | 6.8 | 4.2 | 3.0 | 4.0 | 3.4 |
| 5 | काजु | 6.7 | 11.8 | 6.8 | 7.1 | 7.2 | 3.4 | 2.3 |
| 6 | मसाले | 6.0 | 7.9 | 0.5 | 3.8 | 5.7 | 7.4 | 6.9 |
| 7 | साखर व मळी | 10.1 | 6.1 | 1.9 | 0.6 | 1.8 | 5.3 | 9.7 |
| 8 | कच्चा कापुस | 4.2 | 3.0 | 8.0 | 13.4 | 0.8 | 3.3 | 11.4 |
| 9 | तांदुळ | – – | 1.1 | 10.8 | 7.3 | 10.2 | 13.0 | 9.5 |
| 10 | मासे व सागरी उत्पादने | 1.7 | 6.2 | 10.5 | 15.2 | 22.2 | 8.2 | 10.2 |
| 11 | मांस व मांस उत्पादने | 0.3 | 0.6 | 2.7 | 2.2 | 5.1 | 6.2 | 7.7 |
| 12 | फळे, भाजीपाला व दाळी | 2.2 | 2.5 | 3.9 | 3.4 | 5.0 | 5.2 | 5.5 |
| 13 | इतर प्रक्रिया पदार्थ | 0.3 | 0.6 | 1.7 | 3.4 | 4.5 | 4.5 | 3.1 |
| 14 | एकुण कृषी आणि तत्संबंधी वस्तुंची निर्यात | 596 (100.0) | 644 (100.0) | 2601 (100.0) | 3521 (100.0) | 6256 (100.0) | 16914 (100.0) | 24827 (100.0) |

***संदर्भ :*** India Economic Survey ***2011-12 च्या सांख्यिकीवर आधारीत***